International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.8 No.3 Jan – Feb 2021

# महात्मा ज्योतिबा फुले यांचे शिक्षण विषयक विचार

**डॉ. योगीराज. एस. उरकुडे**
राज्यशास्त्र विभाग, भगवंतराव कला महाविद्यालय सिरोंचा.
**Email-** yogiraj1971@gmail.com
**Corresponding Author: डॉ. योगीराज. एस. उरकुडे**

शोषितांचे उद्धारकर्ते, सत्य धर्माचे पुजारी, पद दलितांचे कैवारी, शेतकऱ्यांचे उद्धारकर्ते, नव मानवता धर्माचे उपासक ,रंजल्या गांजल्याचे आश्रयदाते ,नव समाज निर्मितीचे आद्य प्रवर्तक महात्मा ज्योतिराव फुले यांचा जन्म 11 एप्रिल 1827 ला पुणे येथे झाला .त्यांच्यावर मिशनरी शाळेतील चर्चेचा प्रभाव पडला तसेच थॉमस पेन यांच्या मानवाच्या हक्क या ग्रंथाचा जास्त प्रभाव महात्मा फुले यांच्यावर पडला अशा या महान समाजसुधारकाचा मृत्यू 28 नोव्हेंबर 1890 ला झाला. त्या काळात बहुजन समाज शिक्षणापासून वंचित राहिला होता सामाजिक न्याय राहिला नव्हता.शिक्षण विषयक विचार हा राजकीय विचारांतर्गत समाविष्ट होणारा विषय असल्यामुळे महात्मा फुले यांच्या शिक्षण विषयक विचारांचा आढावा पुढील प्रमाणे घेता येईल.

भारतात ब्रिटिशपूर्व काळातील शिक्षणाबाबत स्थिती:- भारतात आधुनिक शिक्षण पद्धतीचा प्रारंभ ब्रिटिश राजवटीत ब्रिटिशांनी केला ब्रिटिशन्यापूर्वीच्या शिक्षण पद्धतीला पारंपारिक शिक्षण पद्धती असे म्हटले जाते खेड्यामध्ये पारंपारिक शिक्षणाची कोणतीही सोय नव्हती स्त्रिया आणि सुद्रातील सुद्रांना शिक्षण घेण्याचा अधिकार नाही तसेच त्या काळात परंपरेनुसार मानले जात होते ब्रिटिशांच्या भारतातील आगमनानंतर प्रथम ख्रिश्चन धर्मोपदेशकांनी प्रचंड मेहनत घेऊन आधुनिक शिक्षण देण्याची व्यवस्था असणाऱ्या शाळा काढल्या ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या या प्रयत्नांमुळे त्या काळात ब्रिटिश राज्यकर्त्यांना राज्यकारभार चालविण्यासाठी आवश्यक असणारा सेवक वर्ग मिळू लागला व राज्यकर्त्यांची आमची स्वरूपात गरज पूर्ण होत होती ब्रिटिश राज्यकर्त्यांनी अनेक गावात सरकारी शाळा सुरू केल्या. ब्रिटिशांनी सुरू केलेल्या शिक्षण प्रणालीत इतर जातींच्या मुलांची संख्या हळूहळू वाटत गेली कारण ही शिक्षण पद्धती सर्वांसाठी खुली होती १९ व्या शतकात ब्राम्हणेत्तर जातीतून उद्यास आलेल्या नवशिक्षित नेतृत्वाने हक्कापासून वंचित झालेल्या समाज घटकांच्या दुर्दशेचे प्रमुख कारणांचा शोध घेतला अविद्या किंवा निरक्षरता हेच त्यांच्या दुर्दशेचे प्रमुख कारण आहे असे त्यांच्या लक्षात आले म्हणून त्यांनी शिक्षण विषयक विचार मांडणे व शिक्षण प्रसाराचे कार्य करणे यावर भर दिला

**शिक्षणाची आवश्यकता :-** 19 व्या शतकात युरोपीय देशांनी आपला विकास व प्रगती केली समाज जीवनाच्या सर्वच क्षेत्रात युरोपीय देशांची प्रगती होण्याचे मूळ कारण त्यांची ज्ञानोपासना त्यांनी शिक्षणाला दिलेले महत्त्व हे आहे भारतीयांना आपला सर्वांगीण विकास करायचा असेल तर आधुनिक शिक्षणाचा प्रसार सर्वत्र झाला पाहिजे असे ज्योतिराव फुले यांचे मत होते शेतकऱ्यांचे वाढते दारिद्र्य ,धर्म भोळे, मुकाटपणे जुलूम सहन करण्याची प्रवृत्ती यांचे प्रमुख कारण त्यांच्या ज्ञान व शिक्षित पण आहोत या परिस्थितीतून त्यांना बाहेर काढण्यासाठी त्यांची धार्मिक आर्थिक सामाजिक क्षेत्रातील गुलामगिरीतून सुटका करण्यासाठी शिक्षणाशिवाय दुसरा मार्ग नाही हे ज्योतिरावांनी ब्रिटिशांना सांगितले.

**शिक्षण प्रसाराच्या कार्य आणि सार्वजनिक कार्याचा प्रारंभ :-** 1848 या वर्षात महात्मा फुल्यांनी अस्पृश्य मुला मुलींसाठी शाळा सुरू केली ही महाराष्ट्रातच नाही तर संपूर्ण देशात अशी पहिली शाळा होती अनेक कठीण प्रसंगांना न डगमगता 1851साली मुलींसाठी स्वतंत्र शाळा उघडली 1853 ला मागासवर्गीयांसाठी एक मोफत वाचनालय सुरू केले या शैक्षणिक कार्यासाठी त्याकाळच्या कंपनी सरकारने ज्योतिरावांचा सन्मान केला आणि शिक्षण प्रसाराच्या कार्याने ज्योतिबा फुले यांच्या सार्वजनिक कार्याचा प्रारंभ झाला.

**सक्तीचे व मोफत शिक्षण :** बारा वर्षे वयापर्यंतच्या सर्व मुला मुलींसाठी शिक्षणाची व्यवस्था सरकारने करावी अशी मागणी करणारे महात्मा फुले हे पहिले भारतीय होते बालकांना शिक्षण देणे हे शासनाचे कर्तव्य आहे असे त्यांचे मत होते प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केल्यास उच्च शिक्षण घेण्याची संधी अधिकाधिक लोकांना मिळेल व प्रशासकीय पदांवर असणारी ब्राह्मण वर्गाची मक्तेदारी संपुष्टात येईल असे त्यांचे मत होते त्यासाठी बारा वर्षाखालील सर्व मुला मुलींना मोफत व सक्तीचे शिक्षण असावे असा आग्रह त्यांनी धरला.

**स्त्री शिक्षण :-** भारतीय समाजात स्त्रियांना समता व शिक्षण यापासून वंचित ठेवले आहे व्यक्तीचे जीवन विकसित करण्यासाठी शिक्षण हे महत्त्वाचे साधन आहे स्त्रियांचे शिक्षण म्हणजे पर्यायाने तिच्या मुलांची शिक्षण तिच्या कुटुंबाची शिक्षण अशा प्रकारे स्त्री ही समाजाचे मूड आहे त्यामुळे स्त्री शिक्षणाचे महत्त्व महात्मा फुले यांना पटले होते स्त्रियांसाठी पुण्यात त्यांनी पहिली शाळा सुरू केली स्त्रियांचाही न दर्जा आणि त्यांचे अज्ञान त्यांचे मानसिक व शारीरिक हाल त्यांच्या विरोधात देशात पहिला आवाज ज्योतिराव फुले यांनी सुचविला त्यामुळे ज्योतिरावांना स्त्री मुक्तीचा आद्य प्रवर्तक असे म्हटले जाते स्त्रियांना सुशिक्षित करणे हा त्यांच्या मुक्तीचा मार्ग आहे असे मत फुल्यांनी मांडले.

**मागासवर्गीय आणि बहुजन समाजासाठी शिक्षण :-** मागासवर्गीयांच्या अंधश्रद्धा अज्ञान दारिद्र्य गुलामगिरीची मानसिकता दूर करण्याचे एकमेव साधन म्हणजे शिक्षण होय, मागासवर्गीयांच्या आणि बहुजनांच्या शिक्षणाची जबाबदारी शासनाने उचलावी अशा आशियाची निवेदन त्यांनी ब्रिटिश सरकारला सादर केले विद्यार्थी शिक्षणासाठी प्रेरित व्हावे याकरिता सरकारने होतकरू विद्यार्थ्यांना बक्षीस व शिष्यवृत्ती दिली पाहिजे गरीब मुलांसाठी वस्तीगृह काढली पाहिजे अशा सूचना त्यांनी सरकारला केल्या.

**ग्रामीण भागातील मुला मुलींचे शिक्षण :-** शिक्षणाची सोय फक्त शहरात निर्माण करून चालणार नाही तर खेड्यातील मुलामुलींपर्यंत शिक्षण पोहोचले पाहिजे ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार झाला पाहिजे व्यवहार उपयोगी अभ्यासक्रमा असावा शिक्षण पूर्ण झाल्यानंतर शूद्र व ती शूद्र यांना अग्रक्रमाने नोकऱ्या द्याव्या याकडे त्यांनी सरकारचे लक्ष वेधले.

**प्रशिक्षित शिक्षकांची आवश्यकता :-** आधुनिक शिक्षण पद्धती सर्व जाती-जमातीसाठी खुली असली पाहिजे महात्मा फुलांच्या काळात शिक्षण घेणाऱ्यांमध्ये ब्राह्मण समाजाची संख्या अधिक होती उच्चवर्ग हा इतर समाज घटकास जाणून-बुजून अज्ञानात ठेवतो असे ज्योतिरावांचे मत होते त्यामुळेच त्यांनी समाजाच्या सर्व स्तरातून किंवा विविध जाती जमाती मधून शिक्षकांची निवड करावी त्यांना प्रशिकृषण द्यावे प्रशिक्षित शिक्षक दर्जेदार शिक्षण देऊ शकतील मुले शैक्षणिक गुणवत्तेबाबत स्पर्धा करतील मुला-मुलींना उच्च

शिक्षणाच्या संधी प्राप्त होती नोकरी प्राप्त करण्याच्या स्पर्धेत टिकतील असे ज्योतिरावांना वाटत होते त्यामुळे समाजाच्या सर्व स्तरातून दर्जेदार शिक्षण देणारे प्रशिक्षित शिक्षक निर्माण व्हावे असा त्यांचा आग्रह होता.

**शेती विषयक आणि व्यावसायिक शिक्षण :-** ग्रामीण समाजाच्या गरजा नुसार त्यांच्या मुला-मुलींना शिक्षण मिळावे त्यांच्या हाताला काम मिळावे तसेच शहरात विविध उद्योगांना चालना मिळावी तरुणांना रोजगार मिळावा यासाठी आवश्यक ती शेती शिक्षण आणि व्यावसायिक शिक्षण दिले जावे असे महात्मा फुले यांचे मत होते.

**ज्योतिरावांच्या शैक्षणिक कार्याचा उद्देश :-** कष्टकरी समाजाला दास्यमुक्त करून त्यांना आपले नैसर्गिक हक्क ओळखण्यास समर्थ बनविणे हा त्यांच्या शिक्षण प्रसार कार्याचा उद्देश होता आपला स्वतंत्र व्यवसाय चालविण्याची क्षमता निर्माण करणारे व विकसित करणारी शिक्षण मुलांना दिले पाहिजे असा त्यांचा आग्रह होता व्यावसायिक कौशल्य व्यवहार ज्ञान या दोघांचाही शिक्षणामध्ये समावेश झाला पाहिजे असे त्यांचे मत होते.

**ब्रिटिश सरकारचे शिक्षण विषयक धोरण अमान्य :-** ब्रिटिश सरकारचे शिक्षण विषयक धोरण महात्मा फुले यांना मान्य नव्हते ते धोरण दूरदृष्टी नसणारे व अन्यायकारक आहे असे त्यांचे मत होते सरकारी खजिन्यात जमा होणारा पैसा हा कष्टकरी लोकांच्या श्रमातून निर्माण झाला आहे पण त्याचा फायदा उच्चवर्णीयांना होतो सरकारच्या या चुकीच्या धोरणामुळे शूद्र अति शूद्र यांना शिक्षणाच्या पुरेशा संधी मिळत नाही म्हणून ब्रिटिश सरकारने त्यांच्या शिक्षण विषयक धोरणाचा फेरविचार करावा अशी त्यांनी मागणी केली.

**हंटर आयोगास ज्योतिरावांनी दिलेले निवेदन :-** ग्रामीण भागात आणि बहुजन व मागासलेल्या वर्गातील मुलांच्या शिक्षणाकडे सरकारने विशेष लक्ष द्यावे व्यवहार उपयोगी अभ्यासक्रम आखले जावे शिक्षणातून मुलांना प्रगतिशील विचारांचे शिक्षण मिळाले पाहिजे त्यांच्यावर नैतिक संस्कार झाले पाहिजे असे हंटर आयोगात सांगितले प्राथमिक शाळांची संख्या वाढवावी नगरपालिकांनी स्वखर्चाने शाळा चालवाव्या शाळांची तपासणी शिक्षण खात्यामार्फत व्हावी ग्रामीण भागात मोडी लिपी बालबोध वाचन इतिहास हिशोब करण्याची पद्धती इत्यादींचे ज्ञान द्यावे त्याच्या जोडीला शेती करण्यासंबंधीचे ज्ञानही देण्यात यावी अशी मागणी त्यांनी हंटर आयोगास सादर केलेल्या निवेदनात केली.

**लोकशिक्षण :-** ज्या समाजाशी आपल्याला संवाद साधावयाचा आहे तो निरक्षर अज्ञानी आहे त्यामुळे त्यांनी लिखित सज्ञापनापेक्षा मौखिक संवादावर त्यांचा भरोसा होता म्हणून त्यांनी आपल्या बहुतेक पुस्तकांचे स्वरूप सवादात्मक ठेवले गावोगावी त्यांनी आपल्या पुस्तकांची जाहीर वाचनही केले व त्यांनी लोकशिक्षणातून दुर्बल समाज घटकाला जागृत करण्याचा प्रयत्न केला.

**ज्योतिराव फुले यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान :-** महात्मा ज्योतिबा फुले यांनी स्त्री व शूद्र अति शूद्र यांच्या जाणीव जागृती करण्याचा प्रयत्न जीवनभर केला त्यांच्या शिक्षणासाठी तेवरात्र झटले त्या काळातील प्रत्येक पुरोगामी चळवळीच्या पाठीशी त्यांनी आपली संपूर्ण ताकद उभी केली ज्योतीराव फुले यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान पुढील प्रमाणे आहे

१) ज्योतिराव आणि स्त्रियांना शिक्षणाची दारे खुली केली त्यामुळे आज भारतात सर्वच क्षेत्रात स्त्रियांनी झेप घेतली त्याचा आधार महात्मा फुले यांनी सुरू केलेले शिक्षण आहे

२) अंधश्रद्धा कर्मकांड ज्योतिष विद्या याविरुद्ध चळवळ चालवून समाज जागृतीचे कार्य त्यांनी केले.

३) महात्मा फुले यांनी जनसामान्यात अन्याय अत्याचार रुढी परंपरा कर्जबाजारीपणा याबाबत जागृती निर्माण केली.

४) अस्पृश्य समाजातील मुला मुलींसाठी शाळा सुरू केल्या. ५)अस्पृश्यता निवारण्याचे प्रत्यक्ष कार्य केले.

६) प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करावे असा त्यांनी सरकारकडे आग्रह धरला.

७) विविध विषयांवर लेखन करून त्यांनी आपले विचार जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी आपली पुस्तके संवाद रूपाने लिहिली.

आज भारताच्या ग्रामीण भागातील बहुजन समाजात आणि स्त्रियांमध्ये जे शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे शिक्षणामुळे त्यांना जो मानसन्मान प्राप्त झाला आहे समाजात स्त्रियांचा जो दर्जा उंचावला आहे समाजातील अनेक वाईट चालीरीती रूढी प्रथा परंपरा नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत याचे सर्व श्रेय महात्मा ज्योतिबा फुले यांच्या शिक्षण विषयक विचारात आहे.

**संदर्भ ग्रंथ:-**

१). प्रा. रा.ज.लोटे, भारतीय राजकीय विचार,पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स, नागपूर.

२). प्रा. अरविंद शृंगारपुरे, भारतीय राजकीय विचारवंत, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर

३). डॉ. भा.ल.भोळे, भारतीय राजकीय विचार, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर.